# संध्या छाया ज्येष्ठ नागरिक मंडळाचा आज वर्धापनदिन

**इंदिरानगर । वार्ताहर**

गोविंदनगर येथील संध्या छाया ज्येष्ठ नागरिक बहुउद्देशीय मंडळाच्या अकराव्या वर्धापनदिनानिमित्त आज (दि. १४) व उद्या (दि.१५) विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

आज दुपारी ३ ते ६ या वेळेत ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे. तसेच रविवार दिनांक १५ मार्च २०२६. रोजी सायं. ५ वा. ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार समारंभ होणार असून, वयाची ८० वर्षे पूर्ण केलेल्या, ज्येष्ठांचा तसेच वैवाहिक जीवनात ५० वर्षे पूर्ण केलेल्या जोडप्यांचा गौरव करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास आ. सीमा हिरे, महापौर हिमगौरी आकडे- आहेर, साहित्यिक डॉ. यशवंत पाटील, नगरसेवक दिनकर पाटील, नगरसेवक राजेंद्र महाले, नगरसेवक प्रवीण तिदमे, नगरसेवक अमोल पाटील, नगरसेविका पल्लवी गणोरे, समाजसेवक कैलास चुंबळे तसेच लेखक व समाजसेवक किशोरकुमार दीक्षित आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. हा कार्यक्रम विरंगुळा केंद्र संध्या छाया- सद्गुरूनगर येथे होणार असून, ज्येष्ठ नागरिकांनी उपस्थित रहावे असे,आवाहन मंडळाचे अध्यक्ष विठ्ठल देवरे, उपाध्यक्षा सुजाता येवलेकर, सचिव प्राध्यापक जयप्रकाश येवलेकर, सहसचिव राधाकृष्ण जाधव, कोषाध्यक्ष सखाराम देवरे तसेच कार्यकारी मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# १५२ कोटींच्या नव्या गुंतवणुकीने औद्योगिक क्षेत्रात उत्साह

**नाशिक । प्रतिनिधी**

नवीन मोठे उद्योग आणण्याच्या उद्योजक संघटनांच्या प्रयत्नांना यश आले असून, नाशिकच्या औद्योगिक क्षेत्रात सुमारे ९५२ कोटी ४० लाख रुपयांच्या नव्या गुंतवणुकीच्या घोषणांमुळे उद्योजकांनी समाधान व्यक्त केले आहे. मात्र त्यासाठी लॅण्ड बँकेचा अडसर तातडीने दूर करण्याची मागणी केली जात आहे.

राज्य शासनाने वेळोवेळी नाशिकच्या औद्योगिक विकासाला गती देण्याचे आश्वासन दिले होते. मुख्यमंत्री व उद्योगमंत्र्यांनी त्या दृष्टीने पावले उचलल्याने नाशिकच्या औद्योगिक क्षेत्राला नव्याने गती मिळत असल्याचे चित्र आहे. गेल्या महिनाभरात हजारो कोटी रुपयांच्या गुंतवणुकीच्या घोषणा झाल्याने सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योजकांमध्ये (एमएसएमई) आनंदाचे वातावरण आहे.

**महिंद्राचा इलेक्ट्रीक कारचा प्रकल्प**

इगतपुरी तालुक्यातील पारदेवी परिसरात सुमारे ३०० एकर जागेवर महिंद्रा कंपनीचा इलेक्ट्रिक वाहन निर्मिती प्रकल्प उभारण्याचा प्रस्ताव आहे. या प्रकल्पामुळे स्थानिक उद्योग, पुरवठादार आणि बेरोजगार युवकांसाठी मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

**एबीबीचे विस्तारीकरण**

नाशिकमध्ये कार्यरत असलेल्या एबीबी उद्योग समूहानेही उद्योग विस्ताराचा निर्णय घेतला आहे. या अंतर्गत सुमारे २२ दशलक्ष डॉलर्स (सुमारे २०२ कोटी रुपये) गुंतवणुकीतून नवा प्रकल्प उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे २५० ते ३०० पुरवठादार उद्योगांना संधी मिळण्यासह नवीन औद्योगिक इकोसिस्टीम विकसित होण्यास मदत होणार आहे.

**एसीई गॅसेस टेक्नॉलॉजीचा दिंडोरीत प्रकल्प**

दिंडोरी येथे ‘एसीई गॅसेस टेक्नॉलॉजीज प्रा. लि.’ कंपनीकडून सुमारे ७५० कोटी रुपयांची गुंतवणूक केली जाणार आहे. या प्रकल्पातंर्गत लिक्विड मेडिकल ऑक्सिजन आणि औद्योगिक गॅसेस निर्मिती प्रकल्प उभारण्यात येणार असून त्यामुळे आरोग्य व औद्योगिक क्षेत्राला मोठा फायदा होणार आहे.

**टाटा टेक्नॉलॉजीजचा एरोस्पेस व संरक्षण साहित्य निर्मिती**

टाटा टेक्नॉलॉजीज लि. कंपनीकडून ४८०० कोटी रुपयांची गुंतवणूक नागपूर, पुणे, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर येथे एरोस्पेस व संरक्षण क्षेत्राशी संबंधित साहित्य निर्मिती प्रकल्पांसाठी करण्यात येणार आहे.

या सर्व गुंतवणुकीमुळे नाशिकच्या औद्योगिक विकासाला नवी चालना मिळेल तसेच स्थानिक युवकांसाठी रोजगाराच्या संधी वाढतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. निमाचे अध्यक्ष आशिष नहार यांनीही या गुंतवणुकीचे स्वागत केले असून त्यामुळे जिल्ह्याची औद्योगिक क्षमता अधिक मजबूत होण्यास मदत होईल आणि भविष्यात आणखी उद्योगांना आकर्षित करण्यास मदत होईल, असे त्यांनी सांगितले.

**लॅंड बॅंकेचा अभाव कायम**

नव्या उद्योगांसाठी आवश्यक असलेली जमीन उपलब्ध नसल्याबद्दल उद्योजक संघटनांनी चिंता व्यक्त केली आहे. एमआयडीसीकडे अद्याप पुरेशी अधिग्रहित जमीन उपलब्ध नसल्याने अनेक प्रकल्प प्रलंबित आहेत. राजूर-बहुला आणि मापारवाडी ( सिन्नर )परिसरातील नोटिफाईड जागा अद्याप प्रशासनाच्या ताब्यात आलेली नसल्याने त्यांचा प्रत्यक्ष वापर कधी होणार, याबाबत प्रश्नचिन्ह आहे.

महिंद्रा कंपनीच्या मागणीनुसार पारदेवी-आढावणे येथील जमीनही अद्याप पूर्णपणे एमआयडीसीच्या ताब्यात आलेली नसल्याने प्रक्रिया जटिल बनली आहे. तसेच जमीन ताब्यात आल्यानंतर रस्ते, पाणी, वीज आदी मूलभूत सुविधांची उभारणी किती कालावधीत होईल याबाबतही उद्योजकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

# शालार्थ आयडी घोटाळ्याचे दुवे मंत्रालयात

## एसआयटीने फोडले दीडशे कोटींच्या घोटाळ्याचे बिंग

**उपासनी, चव्हाण, बच्छावसह ८४१ जणांवर गुन्हा**

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिकच्या विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयातील तत्कालिन शिक्षण उपसंचालकांनी मार्च २०१९ ते जून २०२५ या सहा वर्षांच्या कालावधीत बनावट ’शालार्थ आयडी’ आणि बोगस वैयक्तिक मान्यता देऊन तब्बल १५० कोटी रुपयांचा गल्ला मारल्याचा खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे. नाशिकरोड पोलीस ठाण्यात उघडउघड खाणाऱ्या तीन माजी शिक्षण उपसंचालकांसह, लेखाधिकारी, मुख्याध्यापक आणि संस्थाचालक अशा अनेकांवर संघटित गुन्हेगारीचा गुन्हा दाखल झाला आहे.

या महाघोटाळ्यात नाशिक विभागाचे तत्कालीन शिक्षण उपसंचालक संशयित नितीन बच्छाव, नितीन उपासनी आणि



डॉ. भाऊसाहेब चव्हाण यांना मुख्य संशयित करण्यात आले आहे. त्यांच्यासोबतच लेखाधिकारी मनीष कदम, उदय पंचभाई आणि संबंधित जिल्ह्यांचे वेतन व भविष्य निर्वाह निधी पथकाचे अधीक्षक तसेच ८४१ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा या कटात सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे. पात्र नसतानाही ८४१ कर्मचारी व शिक्षकांसाठी मागील तारखेत बनावट वैयक्तिक मान्यता आणि शालार्थ आयडीचे आदेश स्वाक्षरित करण्यात आले. उपसंचालकांचा यूजर आयडी आणि पासवर्ड वापरून संगणक प्रणालीत अनधिकृतपणे ’शालार्थ ड्राफ्ट’ भरण्यात आले. धक्कादायक बाब म्हणजे बहुतांश प्रकरणांच्या मूळ फाईल्सच कार्यालयातून गायब आहेत. मुख्याध्यापक, संस्थाचालक आणि वेतन पथक यांनी संगनमत करून कोणतीही पडताळणी न करता या बोगस कर्मचाऱ्यांची वेतन बिले मंजूर केली आणि पैसे लाटले.

**९००जण संशयित**

खासगी शाळांमधील अपात्र कर्मचाऱ्यांच्या समावेशाबाबत शासनाने विशेष चौकशी पथकाची (एसआयटी) नियुक्ती केली. या चौकशीत १ हजार ५३० संशयास्पद आयडी तपासले असता, त्यापैकी ८९२ आयडी पूर्णपणे बनावट असल्याचे आढळले. यातील ५१ जणांवर आधीच गुन्हे दाखल असून, उर्वरित ८४१ जणांवर आता गुन्हा नोंद झाला आहे.

# फेकलेल्या चप्पलांपासून तयार केले प्रतीकात्मक कलाकृती

## क्रिएटिव्ह कुटीर फाऊंडेशनतर्फे रामकुंड परिसरात स्वच्छता मोहीम

**नाशिक । प्रतिनिधी**

रंगपंचमीच्या दिवशी रामकुंड परिसरात झालेल्या गोंधळामुळे गोदावरी नदीची विटंबना झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी क्रिएटिव्ह कुटीर फाऊंडेशनतर्फे स्वच्छता मोहीम राबवुन संस्थेच्या सदस्यांनी रामकुंड परिसरातून हजारो चप्पला आणि कचरा गोळा केला. हजारो चप्पलांपासून प्रतीकात्मक कलाकृती तयार करुन आपली संस्कृती आपल्याला सणानंतर शहर घाण करायला शिकवते का?असा प्रश्न उपस्थीत केला आहे.

रंगपंचमी साजरी करताना अनेकांनी वापरलेल्या चप्पला नदीत व रस्त्यावर फेकून दिल्याने परिसर अस्वच्छ झाला होता.त्याबाबत गेले चार दिवस चर्चा झाली होती.

क्रिएटिव्ह कुटीर संस्थेने स्वच्छता मोहिमेदरम्यान तीन ते चार हजार चप्पलांपासून ‘पंख’तयार केला. या माध्यमातून समाजाला आपली संस्कृती आपल्याला सणानंतर शहर घाण करायला शिकवते का?असा प्रश्न विचारला आहे.




संस्थेच्या संचालिका शितल सोनवणे उगले यांनी सांगितले की, सण साजरा करणे ही आपली परंपरा आहे; मात्र सण संपल्यानंतर शहरात कचरा टाकून जाणे ही संस्कृती नसून ती समाजाच्या बेफिकिरीचे लक्षण आहे. रंगपंचमीच्या काही तासांच्या आनंदासाठी वापरलेल्या चप्पला नंतर गोदावरीत किंवा रस्त्यावर टाकण्यात आल्या. त्यातील बहुतेक चप्पला जैविकरित्या न विघटन होणाऱ्या असल्याने त्या वर्षानुवर्षे मातीमध्ये आणि कचऱ्याच्या ढिगाऱ्यांमध्ये राहणार आहेत.

या चप्पलांपासून तयार केलेले ‘पंख’ हे उंच भरारीचे प्रतीक असले तरी ते प्रत्यक्षात आपल्या निष्काळजीपणाच्या अवशेषांपासून तयार झाले आहेत. या माध्यमातून नागरिकांनी पर्यावरणाबाबत जागरूक होण्याचा संदेश देण्यात आला.

क्रिएटिव्ह कुटीर फाऊंडेशनच्या संचालिका शितल सोनवणे-उगले यांनी नाशिककरांना आवाहन करताना सांगितले की, सण साजरे करताना पर्यावरणाचे भान राखणे आवश्यक आहे. भारताबाहेरही भारतीय संस्कृतीचे अनुकरण केले जाते. त्यामुळे आपली संस्कृती जपत शहर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी प्रत्येक नागरिकाने स्वीकारली पाहिजे. हरित, स्वच्छ आणि सुंदर ‘स्मार्ट नाशिक’ घडवण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, आपण सण साजरा करतोय की आपल्या शहराला आणि निसर्गाला शिक्षा देतोय. हा प्रश्न मनाला विचारावा असे त्या म्हणाल्या.

# गॅस सिलिंडर पुरवठा सुरळीत ठेवा

## अन्न, नागरी पुरवठा विभागाचे निर्देश

**नाशिक । प्रतिनिधी**

संपूर्ण राज्यामध्ये एलपीजी सुरळीत ठेवण्याविषयी तसेच पुरवठ्यावर नियंत्रण ठेवण्यासोबतच आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर यांनी दिले आहेत.

इराण - इस्राईल युध्दाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या घरगुती व व्यावसायिक वापराच्या गॅस सिलिंडर सुरळीत पुरवठयाबाबत राज्य शासन विविध उपाययोजना राबवत आहे. घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण होऊ नयेत आणि संभाव्य टंचाईच्या परिस्थितीत समन्वय साधता यावा, यासाठी राज्य शासनाने जिल्हास्तरावर विशेष समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे.

**जिल्हास्तरावर विशेष समित्या स्थापन**

घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण होऊ नयेत आणि संभाव्य टंचाईच्या परिस्थितीत समन्वय साधता यावा, यासाठी राज्य शासनाने जिल्हास्तरावर विशेष समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, जिल्हा पुरवठा अधिकारी आणि सर्व सरकारी गॅस कंपन्यांचे अधिकारी यांचा या समित्यांमध्ये समावेश असेल. गॅस




पुरवठा साखळीवर देखरेख ठेवणे, कायदा व सुव्यवस्था राखणे तसेच दररोज परिस्थितीचा आढावा घेऊन अहवाल सादर करणे ही समित्यांची प्रमुख जबाबदारी असेल.

पर्यायी इंधनाच्या वापराची शक्यता तपासण्याचे निर्देशही यंत्रणांना देण्यात आले आहेत. यामध्ये कोळसा, रॉकेल आदी पर्यायांचा विचार केला जाणार आहे. जिल्हास्तरीय समित्यांनी हॉटेल व रेस्टॉरंट संघटनांसोबत बैठक घेऊन पर्यायी इंधनाच्या वापरासाठी प्रोत्साहन देण्याचे निर्देश दिले आहेत.

गॅस बुकींग ॲप आणि मिस्ड कॉल सेवांमध्ये येणाऱ्या तांत्रिक अडचणी तातडीने दूर करण्याचे निर्देश तेल कंपन्यांना देण्यात आले आहेत. तसेच राज्य, विभाग, जिल्हा आणि तालुका स्तरावर नियंत्रण कक्ष तातडीने सुरू करून तक्रार निवारणासाठी व्हॉट्सॲप सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

**राज्यात घरगुती एलपीजीचा तुटवडा नाही**

राज्यात घरगुती एलपीजीचा कोणताही तुटवडा नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. घरगुती गॅसची मागणी पूर्ण करण्याइतके पुरेसे उत्पादन आणि साठा उपलब्ध आहे.

व्यावसायिक एलपीजीच्या बाबतीत केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्राधान्यक्रमानुसार रुग्णालये, शाळांमधील मध्यान्ह भोजन योजना,शासकीय आश्रमशाळा, सामुदायिक स्वयंपाकगृहे (कम्युनिटी किचन),तसेच शासकीय शाळा व महाविद्यालयांच्या मेस यांसारख्या अत्यावश्यक सेवांना प्राधान्य देण्यात येत आहे.

इंधनाच्या बाबतीतही राज्यात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. बाजारातील मागणी पूर्ण करण्यासाठी राज्यातील रिफायनरी पूर्ण क्षमतेने कार्यरत आहे.

# गॅस तुटवड्याविरोधात युवासेनेचे आंदोलन

**नाशिक । प्रतिनिधी**

इंधन दरवाढ तसेच घरगुती गॅस सिलिंडरच्या तुटवड्याविरोधात युवासेनेच्यावतीने शुक्रवारी (दि. १३) शालिमार चौक येथील शिवसेना मध्यवर्ती कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात पदाधिकाऱ्यांनी चूल पेटवून अनोख्या पद्धतीने सरकारचा निषेध व्यक्त केला.

यावेळी मोदी सरकारच्या परराष्ट्र धोरणाचा निषेध करत घोषणाबाजी करण्यात आली. वाढत्या इंधन दरामुळे सर्वसामान्य नागरिक त्रस्त झाले असून गॅस सिलिंडरचा तुटवडा निर्माण झाल्याने घरगुती वापरावरही परिणाम होत असल्याची प्रतिक्रिया आंदोलनकर्त्यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना व्यक्त केली. हे आंदोलन युवासेना जिल्हाप्रमुख सागर कोकणे यांच्या नेतृत्वाखाली पार पडले. यावेळी जिल्हासचिव आकाश उगले, प्रविण चव्हाण यांच्यासह युवासेना पदाधिकारी रितेश साळवे, रोहन तांबे, मयुरेश कोथमिरे, नंदेश ढोले, संजय गोसावी, स्वप्नील जाधव, संकेत लासुरे, श्रीकांत चव्हाण, सुदर्शन चंदनानी, योगेश दळे, आयुष निकम, निलेश तांदळे, अजय तिवारी, संदेश पगारे, नयन जैन, राज पगारे, यश कोटमे, राहुल सानप, भारत थेटे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# सायंताराचा वडा बंद; भजे तळले चुलीवर






## सिलिंडर मिळत नसल्याने व्यवसाय अडचणीत

**नाशिक । प्रतिनिधी**

इराण-इस्रायल युद्धाचे पडसाद आता प्रकर्षाने जाणवु लागले आहेत. इंधन पुरवठ्यावर होणाऱ्या परिणामाच्या पार्श्वभूमीवर नाशिक जिल्ह्यातील सुमारे साडेपाच हजार हॉटेल आणि खाद्य व्यवसायिकांवर परिणाम झाला असून, अनेकांना सिलिंडर मिळत नसल्यानं व्यवसाय अडचणीत आला आहे.

गॅस पुरवठा बंद झाल्याने नाशिकचे प्रसिद्ध सायंतारा हॉटेल शुक्रवारी गॅस टाकी उपलब्ध न झाल्याने बंद ठेवण्यात आले होते. साबुदाणा वडे मिळण्याचे हे प्रसिद्ध ठिकाण आहे. हॉटेलबाहेर आज बंद राहणार असल्याचा फलक लावण्यात आला होता.

इंधन टंचाईमुळे व्यावसायिक एलपीजी सिलेंडरच्या पुरवठ्यावर मर्यादा आल्यानं नाशिकमधील छोट्या खाद्य व्यवसायिकांना मोठा फटका बसत आहे. विशेषतः लहान हॉटेल, नाष्टा केंद्र, मेस, चहाचे स्टॉल, टपऱ्या तसेच मिसळ-पाव आणि वडापाव विक्रेत्यांवर या परिस्थितीचा सर्वाधिक परिणाम होत आहे.नाशिकमध्ये गॅस टंचाईमुळे मातीच्या चुलींची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. नागरिक गॅस न मिळाल्यामुळे पर्याय म्हणून मातीच्या चुली घेऊन जेवण बनवत आहेत. हॉटेल्स आणि घरगुती ग्राहक दोघेही मातीच्या चुली खरेदी करत असल्यामुळे बाजारात त्यांचा तुटवडा जाणवू लागला आहे.

नाशिकच्या एका कुटुंबाच्या घरी लग्न होते. पण ऐनवेळी लॉनवाल्यानं हात वर केल्यानं वधूपित्याची हळदीच्या आदल्या दिवशी सिलिंडर गोळा करण्यासाठी धावाधाव करावी लागली.

**भजी, समोसे तळले चुलीवर**

चार्जिंग शेगडी, लाकूड भट्टी, कोळसा भट्टी फॅन वापरून भट्टी लहान असेल तर लहान फॅन, मोठी असेल तर मोठा फॅन, हॉटेल व्यवसाय कधी थांबत नाही. वेगवेगळे पर्याय आहेत, सिलिंडर गॅस नव्हता तेव्हाही आपल्या पूर्वजांनी हॉटेल खानावळ,भोजनालय चालवले आहेत. नाशिककर फक्त एका अडचणीमुळे विचलित नाही होऊ शकत. पर्यटक, भाविक, कामानिमित्त येणारे नागरिक, विद्यार्थी, बाहेरच्या जेवण नाष्ट्यावर अवलंबून असतात. हे त्यांना माहिती आहे. त्यामुळे ते त्यांचा वापर करु लागले आहेत. नाशिक मधील प्रसिद्ध सायंतारा साबूदाणा वडावाला हे दुकान गॅस अभावी बंद होते तर शहरातील एका टेम्पोस्टॅण्डवर एका विक्रेत्याने चूल मांडून समोसे व भजी तळून विकत असल्याचे चित्र होते.

# गांधीजींनी देशाला ’एक राष्ट्र’ म्हणून गुंफले : सपकाळ

## काँग्रेसची लोकप्रतिनिधी कार्यशाळा; गॅस टंचाईवरून सरकारचा निषेध

**नाशिक । प्रतिनिधी**

साडेपाचशेपेक्षा जास्त संस्थानांमध्ये विखुरलेल्या देशाला ’भारत एक राष्ट्र’ ही संकल्पना महात्मा गांधींनी दिली. म्हणूनच त्यांना राष्ट्रपिता संबोधले जाते, असे प्रतिपादन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले. त्र्यंबकेश्वर येथे आयोजित उत्तर महाराष्ट्र विभाग दोन दिवसीय लोकप्रतिनिधी कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते.

गांधींची थोरवी कथन करतांना सपकाळ यांनी स्वातंत्र्य पूर्व घडामोडींचा इतिहास उलगडला. कार्यशाळेतून ज्ञानाची



शिदोरी घेऊन जातांना देशाच्या उन्नत भविष्यासाठी आपल्याला कार्य करायचे आहे. सत्ता असेल अथवा नसेल मात्र देशसेवा हा आपला वसा आहे हे विसरून चालणार नाही, असा संदेश त्यांनी दिला. काँग्रेसला पुनर्वैभव प्राप्त करून देतांना देशाच्या वैभवात भर घालयाची आहे, असेही ते म्हणाले. या कार्यशाळेत माजी मंत्री वसंतराव पूरके, प्रवक्ते हनुमंत पवार, प्रवक्ते निरंजन टकले यांनी मार्गदर्शन केले.

समारोप सत्रात उपस्थितांनी काँग्रेसच्या कार्यशाळेला उपस्थित राहता आले हे आमचे भाग्य आहे अशा शब्दात भावना व्यक्त केल्या. यावेळी प्रदेश उपाध्यक्ष राजाराम पानगव्हाणे पाटील ॲड गणेश पाटील, डॉ. दिनेश बच्छाव, उपाध्यक्ष शरद आहेर, शहराध्यक्ष आकाश छाजेड, प्रदेश सचिव ज्ञानेश्वर गायकवाड आदीसह पदाधिकारी कार्यकर्ते व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांमध्ये सहभाग घेतलेले उमेदवार उपस्थित होते. नाशिक जिल्हा काँग्रेस कमिटीचे दक्षिण विभागाचे जिल्हाध्यक्ष भारत टाकेकर व उत्तर विभागाचे जिल्हाध्यक्ष रमेश कहांडोळे यांनी या शिबिराचे संयोजन केले.दोन दिवसांच्या कार्यशाळेने भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या परिवारात चैतन्य निर्माण केले आहे. त्र्यंबकेश्वर येथील श्रीचंद्र घाट परिसरात वातावरण तिरंगामय झाले होते.

**कृत्रिम गॅस ट्चाईचा आंदोलनाने निषेध**

कार्यशाळेच्या प्रथम व द्वितीय सत्राच्या दरम्यानच्या कालावधीत प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसचे आजी माजी लोकप्रतिनिधी, पदाधिकारी कार्यकर्ते येथील एलपीजी गॅस एजन्सीवर धडकले. यावेळी शासनाचा निषेध करणारे फलक हाती होते. प्रतिकात्मक गॅस सिलिंडर तयार करून आणले होते. विशेष म्हणजे सकाळपासून येथे गॅस सिलिंडर मिळवण्यासाठी रांगा लागलेल्या होत्या. वितरण करणारे वाहन शहरात फिरत नाही म्हणून नागरिक स्वत: सिलिंडर घेऊन आलेले होते.तथापि सकाळी ७ पासून दुपारी २ पर्यंत सिलेंडर असलेले वाहन पोहचले नव्हते.

# गॅस तुटवड्याविरोधात मनसे आक्रमक

## काळाबाजार झाल्यास ‘मनसे स्टाईल’ इशारा

**सातपूर । प्रतिनिधी**

देशात निर्माण झालेल्या युद्धजन्य व तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा निर्माण होण्याची भीती नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर सातपूर येथील वैशंपायन गॅस सर्व्हिस एमआयडीसी सातपूर या गॅस एजन्सीला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी निवेदन देवून गॅस सिलिंडरचा कृत्रिम तुटवडा निर्माण होऊ नये आणि काळाबाजार विक्री होता कामा नये अशी मागणी केली.

नागरिकांना घरगुती गॅस सिलिंडर वेळेवर आणि पारदर्शक पद्धतीने मिळणे अत्यंत आवश्यक आहे. ऑनलाइन बुकिंग केलेल्या ग्राहकांना



वितरणाबाबत अचूक माहिती देण्यात यावी तसेच गॅस वितरणात कोणतीही अनियमितता होणार नाही, याची एजन्सीने विशेष खबरदारी घ्यावी.

युद्धजन्य परिस्थितीचा गैरफायदा घेत गॅस सिलिंडरची काळाबाजारात विक्री होत असल्याचे आढळल्यास महाराष्ट्र नवनिर्माण सेना संबंधितांवर कडक भूमिका घेईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. नाशिककर नागरिकांच्या हिताचा विचार करून गॅस वितरण नियोजनबद्ध व पारदर्शक पद्धतीने करण्यात यावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

यावेळी मनसेचे शहर उपाध्यक्ष मिलिंद कांबळे, विभाग अध्यक्ष सचिन सिन्हा, शहर उपाध्यक्ष किशोर वडजे, शहर सरचिटणीस वैभव रौंदळ यांच्यासह बादल निकम, अभिषेक पाल, कृष्णा सोनवणे आदी मनसैनिक उपस्थित होते.